दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

आ नो भद्रा: क्रतवो यन्तु विश्वत:

## मासिक ई-मॅगझीन

MAY 2026

महिना : मे २०२६

महाविद्यालयात
आयोजित विविध शैक्षणिक, सांस्कृतिक,
क्रीडा व सामाजिक उपक्रमांचा आढावा सादर करणारे
मासिक ई-मॅगझीन.








No : 1234567890000000000



# कीर्तनाच्या सेवेतून यशाची गगनभरारी: दयानंद कला महाविद्यालयाच्या यशवंत कातळेचे दैदिप्यमान यश!

लातूर: जिद्द, अथांग मेहनत आणि योग्य शैक्षणिक जडणघडण लाभली की, ग्रामीण भागातील सामान्य विद्यार्थीही यशाची कशी गगनभरारी घेऊ शकतो, याचे ज्वलंत उदाहरण लातूरच्या दयानंद कला महाविद्यालयाने पुन्हा एकदा समाजासमोर ठेवले आहे. महाविद्यालयाचा बी.ए. द्वितीय वर्षात शिकणारा विद्यार्थी आणि प्रसिद्ध तरुण कीर्तनकार ह.भ.प. यशवंत कातळे याने आपल्या अमोघ वाणीने आणि कीर्तनसेवेच्या जोरावर संपूर्ण महाराष्ट्रात नाव उज्वल केले आहे. कीर्तनसेवेच्या प्रवासासाठी गावोगावी फिरताना लागणारी गरज ओळखून त्याने स्वतःच्या कष्टाने आणि मेहनतीच्या जोरावर 'टाटा सिएरा'(TATA SIERRA) ही आलिशान गाडी खरेदी केली असून, दयानंद कला महाविद्यालयाच्या वतीने या गाडीचे अत्यंत मनोभावे पूजन करून यशवंतचा विशेष गौरव करण्यात आला.




या कौतुक सोहळ्याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे आणि श्री. प्रसाद कातळे प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी यशवंतला भावी वाटचालीस शुभेच्छा देताना प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड म्हणाले की, ह.भ.प. यशवंत कातळे हा इयत्ता तिसरीपासूनच कीर्तनाची सेवा बजावत आहे. परंतु, त्याने जेव्हा दयानंद कला महाविद्यालयाच्या इयत्ता अकरावीच्या वर्गामध्ये प्रवेश घेतला, तेथून खऱ्या अर्थाने त्याच्या ज्ञानामध्ये प्रगल्भता आली. येथील समृद्ध आणि प्रेरणादायी शैक्षणिक वातावरणामुळे त्याच्या ज्ञानाच्या कक्षा अधिक रुंदावत गेल्या. तो सध्या बी.ए. च्या दुसऱ्या वर्षामध्ये शिक्षण घेत असून भविष्यात तो ज्ञानाची अजून अनेक क्षितिजे पादाक्रांत करेल यामध्ये कोणतीही शंका नाही. आज तो जरी स्वतःच्या कष्टाने घेतलेल्या टाटा सिएरा कारमधून प्रवास करत असला, तरी भविष्यात तो आपल्या कीर्तनसेवेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर जाऊन विमानाने प्रवास करेल यात यत्किंचितही शंका नाही, असा विश्वास प्राचार्यांनी व्यक्त केला.

उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी यशवंतचे भरभरून कौतुक करत त्याला शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले की, यशवंत जेव्हा अकरावीमध्ये आमच्याकडे प्रवेशासाठी आला, त्यावेळेस त्याला केवळ चार भिंतीतील शिक्षणापुरते मर्यादित न ठेवता, महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या अथांग पुस्तकांच्या आणि ग्रंथालयाच्या माध्यमातून त्याचा सामाजिक दृष्टिकोन कसा वृद्धिंगत होईल, यासाठी पूर्णपणे वैचारिक स्वातंत्र्य दिले गेले. याचाच परिपाक म्हणजे आज तो उत्तम कीर्तनकार बनून समाजाला प्रबोधनाची सुंदर सेवा देत आहे.

आपल्या यशाचे श्रेय महाविद्यालयाला देत यशवंत कातळे याने दयानंद शिक्षण संस्था व दयानंद कला महाविद्यालयाविषयी अत्यंत कृतज्ञतापूर्वक गौरोद्गार काढले. तो म्हणाला की, संपूर्ण महाराष्ट्रात नामांकित असलेल्या दयानंद शिक्षण संस्थेत आणि त्यांतर्गत येणाऱ्या दयानंद कला महाविद्यालयात प्रवेश घेणे हे माझे एक मोठे स्वप्न होते. या महाविद्यालयात चालू असलेले शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या केवळ ज्ञानाच्या कक्षाच रुंदावत नाही, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच त्यांच्या आध्यात्मिक विकासावरही तितकाच भर देते. दयानंद कला महाविद्यालय हे सर्वगुणसंपन्न असून विद्यार्थ्यांची शैक्षणिक, सामाजिक व मानसिक जडणघडण या ठिकाणी अत्यंत चोखपणे केली जाते. रेणापूर तालुक्यातील एका छोट्याशा गावातून येऊन मी जेव्हा दयानंदमध्ये प्रवेश घेतला, तेव्हा याच महाविद्यालयाने माझ्यामध्ये व्यासपीठ गाजवण्याचा आणि समाजासमोर उभे राहण्याचा सभाधीटपणा आणला. आज मी वाडी-वस्तीपासून ते भारतातल्या विविध राज्यांपर्यंत सामाजिक संदेश, समाजप्रबोधन व शिक्षणाविषयीची जनजागृती माझ्या कीर्तनातून करत आहे, ती केवळ दयानंदच्या संस्कारांमुळेच. पुढे बोलताना यशवंतने महाराष्ट्रातील तमाम विद्यार्थी मित्रांना आवाहन केले की, ज्या च्या विद्यार्थ्यांना आपले भविष्य उज्ज्वल व उत्तुंग घडवायचे आहे, अशा प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्ता ११ वीच्या प्रवेशासाठी 'दयानंद कला महाविद्यालयाचीच' निवड करणे गरजेचे आहे. आपल्या ग्रुपवरील प्रत्येक मित्राने आपल्या यशस्वी भविष्यासाठी दयानंद कला महाविद्यालयातच प्रवेश घ्यावा आणि आपल्या करियरला एक नियोजितबद्ध व सुंदर आकार प्राप्त करून घ्यावा. या गाडी पूजन सोहळ्याप्रसंगी डॉ. अंकुशकुमार चव्हाण, सेवानिवृत्त क.म. वि. शिक्षक श्री. बी.ए. उटीकर, प्रा. दशरथ ननावरे, डॉ. सुधीर गाडवे, प्रा. सुरेश क्षीरसागर, प्रा. राजू मोरे, प्रा. मनोज गवरे, प्रा. महेश जंगापल्ले आदी प्राध्यापक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सध्या संपूर्ण लातूर जिल्ह्यात दयानंद कला महाविद्यालयाचे आणि विद्यार्थी यशवंत कातळेचे कौतुक होत असून, इयत्ता ११ वीच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांमध्ये दयानंद कला महाविद्यालयाविषयी प्रचंड ओढ निर्माण झाली आहे.



# दयानंद कला महाविद्यालयात गुणवंतांचा ओढा!
# 96% गुण मिळवणाऱ्या कु. त्रिशा मुंदडाचा विशेष सत्कार



लातूर: शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच साहित्य, संगीत, कला आणि क्रीडा क्षेत्रात आपल्या यशाची घोडदौड अविरत सुरू ठेवणारे, लातूर येथील दयानंद कला महाविद्यालय हे गुणवंत विद्यार्थ्यांची पहिली पसंती ठरत आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या सीबीएसई (CBSE) दहावी बोर्ड परीक्षेत तब्बल ९६% गुण मिळवून दैदिप्यमान यश संपादन करणारी विद्यार्थिनी कु. त्रिशा ईश्वरप्रसाद मुंदडा हिने अकरावी कला (Arts) शाखेत दयानंद महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे. या निमित्ताने महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्रिशाचा मनःपूर्वक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष तथा शालेय समितीचे अध्यक्ष श्री. ललितभाई शाह व सचिव श्री. रमेश बियाणी यांनी कु. त्रिशा मुंदडा हिचे कौतुक करून तिला भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी म्हणाले की, "गुणवंत आणि सुसंस्कारी पिढी घडवणे हेच दयानंद शिक्षण संस्थेचे मुख्य ध्येय आहे. त्रिशासारख्या ९६% गुण मिळवणाऱ्या अत्यंत बुद्धिमान विद्यार्थिनीने कला शाखेची निवड करणे आणि त्यासाठी दयानंद महाविद्यालयावर विश्वास दाखवणे, हे आमच्या दर्जेदार शिक्षण पद्धतीचे यश आहे. कला क्षेत्रात करिअरच्या अथांग संधी उपलब्ध आहेत. अशा सर्वच गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीशी दयानंद शिक्षण संस्था आर्थिक व शैक्षणिक पातळीवर नेहमीच खंबीरपणे उभी राहील."

संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी यांच्या याच विचारांचा आणि मार्गदर्शनाचा गौरवपूर्ण उल्लेख करत प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड म्हणाले की, "सध्याच्या स्पर्धात्मक युगात सतत प्रगती करण्यासाठी मेहनत आणि बुद्धीचा योग्य वापर करणे आवश्यक आहे. दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये मुलींची संख्या अधिक असते, कारण त्या सातत्याने आपल्या बुद्धीला चालना देत असतात. त्रिशाने दयानंद कला महाविद्यालयात प्रवेश घेतल्याने महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. स्पर्धा परीक्षांमधील यश आणि बोर्ड परीक्षांचे उत्कृष्ट निकाल यामुळे हे महाविद्यालय पालकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या पसंतीस उतरले आहे." प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी पुढे सांगितले की, "येथे उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक आणि डिजिटल वर्गखोल्या, अद्ययावत संगणक प्रयोगशाळा आणि समृद्ध ग्रंथालय यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाचा उत्तम अनुभव मिळतो. यासोबतच सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना (NSS), राष्ट्रीय छात्र सेना (NCC) आणि क्रीडा विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व कौशल्यांना वाव दिला जातो, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने कला, क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्रात चमकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी लाखो रुपयांची शिष्यवृत्ती देऊन प्रोत्साहित केले जाते. आमच्या नामांकित अशा कला महाविद्यालयांमध्ये मिळणारे उत्तम वातावरण आणि संस्कारमूल्ये यामुळे आज राज्यातील गुणवंत विद्यार्थी दयानंद महाविद्यालयाकडे आकर्षित होत आहेत." कु. त्रिशा मुंदडा हिच्या या यशाबद्दल आणि भावी शैक्षणिक वाटचालीसाठी महाविद्यालयातर्फे तिचे हार्दिक अभिनंदन आणि मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात येत आहेत. कला महाविद्यालयाच्या या स्तुत्य उपक्रमाचे आणि गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# लोकनेते विलासराव देशमुख यांच्या 81 व्या जयंतीनिमित्त विनायकराव पाटील यांच्याकडून अनोख्या उपक्रमाचे आयोजन; शिक्षण संस्थाचालक, प्राचार्य व गुणवंतांचा ऐतिहासिक 'लातूर पॅटर्न' च्या आठवणींसह गौरव!






दयानंद लातूर: महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व लोकनेते स्वर्गीय विलासराव देशमुख यांच्या ८१ व्या जयंती निमित्त शहरात विविध सामाजिक आणि आगळ्यावेगळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विलासराव देशमुख साहेबांचे येथील आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासातील, विशेषतः शैक्षणिक क्षेत्रातील योगदान अतुलनीय आहे. श्री. विनायकराव पाटील कवठेकर यांनी जयंतीचे औचित्य साधून जनहिताचे आणि समाजोपयोगी उपक्रम राबवत साहेबांच्या स्मृतींना एका विशेष व आगळ्यावेगळ्या पद्धतीने उजाळा दिला. या जयंतीनिमित्त तुलसी हॉलमध्ये, या परिसराला 'शैक्षणिक पंढरी' बनवणाऱ्या शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल विविध शिक्षण संस्थाचालक, प्राचार्य आणि गुणवंतांचा विशेष गौरव करण्यात आला. शिक्षणाच्या क्षेत्रात संपूर्ण देशभरात जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करणारा 'लातूर पॅटर्न' आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय विलासराव देशमुख साहेबांचे एक अत्यंत जवळचे आणि ऐतिहासिक नाते राहिले आहे. या मातीचे सुपुत्र असलेल्या विलासराव देशमुख साहेबांनी या शैक्षणिक चळवळीला मोठे राजकीय आणि प्रशासकीय बळ दिले. विलासराव देशमुख साहेबांच्या याच दूरदृष्टीमुळे आज हे शहर स्पर्धा परीक्षा,NEET, JEE आणि उच्च शिक्षणासाठी देशातील एक प्रमुख केंद्र बनले आहे. या परिसराला शिक्षणाचे माहेरघर बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या साहेबांनी या यशाचे श्रेय नेहमीच तिथल्या शिक्षकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या कष्टाला दिले.

लातूर शहराच्या महापौर जयश्रीताई सोनकांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. त्यांनी विनायकराव पाटील यांनी आयोजित केलेल्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. त्यानंतर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी सध्याच्या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाच्या असलेल्या 'नीट' (NEET) पेपर फुटीच्या प्रकरणावर आपले परखड मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी होणारा हा खेळ थांबवण्यासाठी आणि परीक्षेतील पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी या समस्येकडे गांभीर्याने पाहणे किती गरजेचे आहे, याकडे त्यांनी सर्वांचे लक्ष वेधले.

शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना लातूरच्या शैक्षणिक परंपरेची जपणूक करण्यावर भर दिला. लातूरचा लौकिक वाढवण्यात महत्त्वाचा वाटा असलेल्या दयानंद व शाहू शिक्षण संस्थेसारख्या पवित्र विद्या मंदिरांना आणि त्यांच्या प्रतिमेला कोणत्याही कारणाने कधीही गालबोट लागू नये, यासाठी संपूर्ण शैक्षणिक वर्गाने अत्यंत दक्ष आणि कटिबद्ध राहिले पाहिजे, अशी भावना त्यांनी या वेळी व्यक्त केली.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.लक्ष्मीरमण लाहोटी यांनी आपले मत मांडताना लातूरमधील संस्थांच्या दर्जेदार कामगिरीचा गौरव केला. येथील शैक्षणिक संस्थांचे कार्य अत्यंत आदर्श व चोख असून 'नीट' आणि 'जेईई' सारख्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षांच्या पूर्वतयारीमध्ये लातूरने नेहमीच भरीव, यशस्वी व उल्लेखनीय काम केले असल्याचे त्यांनी अभिमानाने नमूद केले. याच ऐतिहासिक शैक्षणिक वारशाचा सन्मान करण्यासाठी तुलसी हॉलमध्ये आयोजित केलेल्या शानदार सोहळ्यात, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य डॉ. अनिरुद्ध जाधव यांचा सत्कार शहराच्या महापौर जयश्रीताई सोनकांबळे आणि विनायकराव पाटील कवठेकर यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव श्री.रमेश बियाणी यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. विनायकराव पाटील यांनी आयोजित केलेल्या या अनोख्या आणि समाजोपयोगी उपक्रमाची उपस्थितांनी उत्स्फूर्त कौतुक केले. या सोहळ्याला शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सहसचिव उद्धवराव पाटील, प्राचार्य डॉ. आर.एल. कावळे, ॲड. शहाजी मनाळे, शिवाजीराव भोसले, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, प्रा. डी.के. देशमुख, प्रकाश देशमुख, अमर देशमुख आणि प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, माजी उपप्राचार्य श्री. अनिलकुमार माळी यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विलासराव देशमुख साहेबांच्या आठवणींना उजाळा देत आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात, वेगळ्या पद्धतीने आणि यशस्वीपणे संपन्न झाला.



# 1981 च्या बॅचची दयानंद शिक्षण संस्थेस आत्मीय भेट; गुरुजनांच्या आठवणींनी दाटले वातावरण



लातूर : दयानंद शिक्षण संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या 1981 च्या बॅचमधील माजी विद्यार्थ्यांनी नुकतीच महाविद्यालयास आत्मीय भेट देत आपल्या विद्यार्थी जीवनातील आठवणींना उजाळा माजी विद्यार्थी सेवानिवृत्त न्यायाधीश श्री जोशी जे. के, श्री नरसिंह शेरखाने पोलिस अधीक्षक महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती सुभदा रेड्डी, सेवानिवृत्त प्राचार्य श्री. जाधव तानाजी, सेवानिवृत्त नायब तहसीलदार सुनील जोशी, श्री. विनोद राठी, श्री. शिवाजी पवार, श्री अपसिंगेकर रवींद्र यांनी दिला. विशेष म्हणजे श्रीमती नंदिनी देशमुख, श्रीमती नीता अंधारे, श्रीमती ज्योती मिते या आदर्श गृहिणी म्हणून यांचा महाविद्यालयास सार्थ अभिमान आहे. सुमारे चार दशकांनंतर पुन्हा एकदा महाविद्यालयाच्या परिसरात एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी वर्गखोल्या, ग्रंथालय तसेच विविध विभागांना भेट देत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

माजी विद्यार्थ्यांनी त्यांनी शिक्षण घेतलेल्या वर्गखोल्यांमध्ये जाऊन त्या काळातील शैक्षणिक वातावरण, शिक्षकांचे मार्गदर्शन, सांस्कृतिक उपक्रम आणि मित्रमैत्रिणींसोबत घालवलेले क्षण यांची मनमोकळी उजळणी केली. वर्गात बसून अनेकांनी विद्यार्थीदशेतील संस्मरणीय प्रसंग सांगितले. महाविद्यालयाने दिलेल्या शिक्षणामुळे आणि गुरुजनांच्या संस्कारांमुळेच जीवनात यशस्वी वाटचाल करता आली, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

यावेळी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या शिक्षकांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. काहींनी शिक्षकांच्या अध्यापन पद्धती, शिस्तप्रियता आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या जिव्हाळ्याच्या अनेक आठवणी सांगितल्या. या आठवणींमुळे वातावरण भावनिक झाले होते. माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील सध्याच्या शैक्षणिक प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करत विविध सुविधा, गुणवत्ता वृद्धी उपक्रम आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांचे कौतुक केले. तसेच भविष्यातही महाविद्यालयाच्या विकासासाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली.

या प्रसंगी कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ.मनीषा आष्टेकर, डॉ. साईनाथ उमाटे, अधीक्षक श्री. संजय व्यास, श्री. रामकिशन शिंदे, श्री. सचिन वांगस्कर आणि श्री. प्रमोद मुंगळे उपस्थित होते. त्यांनी माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधून महाविद्यालयाच्या प्रगतीची माहिती दिली तसेच त्यांच्या आठवणी जाणून घेतल्या.

1981 च्या बॅचची ही भेट केवळ पुनर्मिलन नव्हे, तर गुरु-शिष्य नात्याचा सन्मान, महाविद्यालयाबद्दलची कृतज्ञता आणि जपलेल्या मैत्रीचे दर्शन घडविणारा एक भावनिक आणि संस्मरणीय सोहळा ठरला. जुन्या आठवणींच्या सहवासात घालवलेले हे क्षण सर्व माजी विद्यार्थ्यांच्या मनात कायमचे कोरले गेले.

# मासिक ई-मॅगझीन

**महिना : मे २०२६**

**संपर्क**
**दयानंद कला महाविद्यालय, लातूर**
**ईमेल : daclatur@rediffmail.com वेबसाईट : www.daclatur.org**

**आभार**
**या ई-मॅगझीनच्या निर्मितीसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी यांचे मनःपूर्वक आभार.**